0 5 AUG 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'चाईचा मोहोर' रोखू शकतो 'स्मृतिभ्रंश'

## विद्यापीठातील डॉ. ज्योती जाधव, स्नेहा पाटील यांचे संशोधन; आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल

**संतोष मिठारी :**
**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : पावसाळ्यात रानभाज्यांची आरोग्यपर्वणी सर्वांना उपलब्ध होते. त्यातील 'चाईचा मोहोर' ही रानभाजी स्मृती, विचारशक्तीशी संबंधित असणारा स्मृतिभ्रंश (अल्झायमर) आजार रोखू शकते, असे शिवाजी विद्यापीठातील



**प्रा. डॉ. ज्योती जाधव**



**स्नेहा पाटील** संशोधक विद्यार्थिनी

संशोधनातून समोर आले आहे. याबाबत जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख प्रा. डॉ. ज्योती जाधव, विद्यार्थिनी स्नेहा रामचंद्र पाटील यांनी गेली तीन वर्षे केलेल्या संशोधनाची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेतली आहे.

बोलीभाषेत 'चाईचा मोहोर' या रानभाजीला गाभोळीचा, शेंडूर, शेंडवेल म्हणून ओळखले जाते. तिचे शास्त्रीय नाव 'डायोस्कोरिया पेन्टाफाईला' आहे. कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सातारा, रायगड, नाशिक जिल्ह्यांमध्ये ती भाजी आढळून येते. आयुर्वेदामध्ये तिचा

पान ९ वर >



कोल्हापूर : चाईचा मोहोर रानभाजी.

> निर्सगाशी नाते जपणाऱ्या रानभाज्या आणि पारंपरिक भारतीय आहारातील साधेपणातच एक अद्भुत विज्ञान दडलेले आहे. ते आमच्या संशोधनातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. 'चाईचा मोहोर'मध्ये आढळलेले जैवसक्रिय गुणधर्म अल्झायमरसारख्या स्मृतिसंबंधित मेंदूच्या आजारावर गुणकारी आहे. ते पारंपरिक ज्ञान, आधुनिक विज्ञानाची सांगड घालून नैसर्गिक, सुरक्षित उपचारांची नवी दिशा उलगडणे हेच आमचे उद्दिष्ट आहे.
> -प्रा. डॉ. ज्योती जाधव, जैवतंत्रज्ञान अधिविभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ

# 'चाईचा मोहोर' रोखू शकतो 'स्मृतिभ्रंश'

> पान १ वरून

उपयोग शरीराला बळकटी देणे, दाह कमी करणे, पचनक्रियेबाबतच्या आजारांवर उपयोगी असा उल्लेख आहे. ते औषधी गुणधर्म लक्षात घेऊन स्मृतिभंशासारख्या आजारावर या भाजीची उपयुक्तता तपासण्यासाठी विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान विभागात प्रा. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्नेहाने संशोधन सुरू केले.

ॲसिटाईल कोलिन इस्टरेज इनजाईमचे इनहिबीशन करून ॲसिटाईलकोलीनची पातळी टिकवून ठेवता येते. त्यादृष्टीने या संशोधनात 'चाईचा मोहोर'चा अर्क तयार करून रासायनिक विश्लेषण केले. त्यात ॲसिटाईलकोलीन इस्टरेज इनहिबिट करणारी जैविक संयुगे (बायोॲक्टिव्हज), उपघटक ॲंटिऑक्सिडन्ट, ॲंटिइन्लामेट्री, फिनॉलिक्स, फ्लेहोनॉईडस मोठ्या प्रमाणात दिसून आले. मुख्यतः गॅलिक ॲसिड, व्हॅनिलिक ॲसिड, मोलिशेपिन, हायड्रोसिनामिक ॲसिड पुरेशा प्रमाणात असल्याचे स्पष्ट झाले. पोषणतत्त्वे असणारे हे सर्व घटक रोगप्रतिकारशक्ती वाढवून स्मृतिभंशासारख्या आजरांपासून प्रतिबंध करतात. या रानभाजीतील जैविकसंयुगेमध्ये मज्जातंतूचे संरक्षण कवच म्हणून काम करण्याची क्षमता असल्याचे संशोधनातून स्पष्ट झाले आहे. या संशोधनाची दखल नेदरलँड्समधील 'एलसव्हियर' आंतरराष्ट्रीय नियतकालिकाने दखल घेऊन ते प्रसिद्ध केले आहे. विद्यापीठातील संसाधनांच्या माध्यमातून संपूर्ण संशोधन 'माझ्या निर्सगसंपन्न चंदगड तालुक्यात अनेक प्रकारांच्या औषधी रानभाज्या आढळून येतात. विद्यापीठातील संसाधने, सुविधा वापरून हे संपूर्ण संशोधन केले असल्याचे संशोधक विद्यार्थिनी स्नेहा पाटील हिने सांगितले.'

### औषध निर्मितीत वापर होईल

गेल्या तीन वर्षांच्या संशोधनातून अल्झायमरवर गुणकारी ठरणारे 'चाईचा मोहोर'मध्ये आढळलेले जैवसक्रिय गुणधर्म सर्वांसमोर आम्ही आता पहिल्यांदाच मांडले आहेत. भविष्यात त्याचा अल्झायमरवरील औषध निर्मितीत वापर होईल, असे डॉ. जाधव यांनी सांगितले.

0 5 AUG 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षणासोबत प्रत्यक्ष औद्योगिक प्रशिक्षणही

## विद्यापीठात बी.एस्सी. मायक्रोबायोलॉजी अभ्यासक्रमास प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ सूक्ष्मजीवशास्त्र विभागामध्ये यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून बी.एस्सी. मायक्रोबायोलॉजी (औद्योगिक प्रशिक्षण अंतर्भूत पदवी अभ्यासक्रम) या अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. हा अभ्यासक्रम शिक्षणासोबतच प्रत्यक्ष औद्योगिक प्रशिक्षण देणारा महाराष्ट्रातील पहिला अभ्यासक्रम ठरणार आहे. या अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना सैद्धांतिक शिक्षणासोबतच शेवटच्या सत्रात प्रत्यक्ष औद्योगिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे शिक्षण व त्यासोबत प्रत्यक्ष औद्योगिक प्रशिक्षण या दोहोंचा समन्वय साधत विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिक संधींसाठी तयार करण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमांतून पदवीधर होणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण, संशोधन संस्था, औषधनिर्मिती उद्योग, दुग्ध व अन्न प्रक्रिया उद्योग, कृषी जैवतंत्रज्ञान व जैविक खते उत्पादन, वैद्यकीय निदान प्रयोगशाळा, तसेच पर्यावरणीय विश्लेषण व संशोधन अशा अनेक क्षेत्रांमध्ये करिअरची संधी उपलब्ध होणार आहेत.

**अभ्यासक्रमाचे नाव : बी.एस्सी. मायक्रोबायोलॉजी**

कालावधी: ३ वर्षे (६ सत्रे)

**प्रवेश क्षमता : ६० विद्यार्थी (पहिला अर्ज, पहिली संधी तत्त्वावर)**

पात्रता : १२ वी विज्ञान शाखा

**प्रारंभ तारीख : ११ ऑगस्ट २०२५**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 AUG 2025
तरुण भारत

# विद्यापीठात बी. एस्सी. मायक्रोबायोलॉजीला प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागात यंदापासून बी.एस्सी. मायक्रोबायोलॉजी अभ्यासक्रम सुरू केला आहे. औद्योगिक प्रशिक्षण अंतर्भूत पदवी अभ्यासक्रमाची सुरुवात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार हा अभ्यासक्रम विकसित केला आहे. औद्योगिक प्रशिक्षण देणारा महाराष्ट्रातील पहिला अभ्यासक्रम ठरणार आहे. या अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना सैद्धांतिक शिक्षणासोबतच शेवटच्या सत्रात प्रत्यक्ष औद्योगिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे शिक्षणाबरोबर औद्योगिक प्रशिक्षणाचा समन्वय साधत विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिक संधी मिळणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 AUG 2025
पुढारी

# बी.एस्सी. मायक्रोबायोलॉजी अभ्यासक्रमास विद्यापीठात प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ सूक्ष्मजीवशास्त्र विभागामध्ये बी.एस्सी. मायक्रोबायोलॉजी (औद्योगिक प्रशिक्षण अंतर्भूत पदवी अभ्यासक्रम) या अभिनव अभ्यासक्रमाची सुरुवात झाली. या अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना सैद्धांतिक शिक्षणासोबतच शेवटच्या सत्रात प्रत्यक्ष औद्योगिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. अभ्यासक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांना उद्योगसज्ज बनवणे आहे. पदवीधर होणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, संशोधन संस्था, औषधनिर्मिती उद्योग, दुग्ध व अन्न प्रक्रिया उद्योग, कृषी जैवतंत्रज्ञान व जैविक खते उत्पादन, वैद्यकीय निदान प्रयोगशाळा, पर्यावरणीय विश्लेषण व संशोधन अशा अनेक क्षेत्रांमध्ये करिअरची संधी उपलब्ध होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 AUG 2025
सकाळ

# बी. एस्सी. मायक्रोबायोलॉजी विद्यापीठात सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागामध्ये यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून बी. एस्सी. मायक्रोबायोलॉजी (औद्योगिक प्रशिक्षण अंतर्भूत पदवी अभ्यासक्रम) या अभ्यासक्रमाची सुरुवात केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विकसित करण्यात आलेला हा अभ्यासक्रम शिक्षणासह प्रत्यक्ष औद्योगिक प्रशिक्षण देणारा महाराष्ट्रातील पहिला ठरणार आहे. विद्यार्थ्यांना सैद्धांतिक शिक्षणासह शेवटच्या सत्रात प्रत्यक्ष औद्योगिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे शिक्षण व त्यासमवेत प्रत्यक्ष औद्योगिक प्रशिक्षण या दोहोंचा समन्वय साधत विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिक संधींसाठी तयार करण्यात येणार असल्याची माहिती प्रा. डॉ. पंकज पवार यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 AUG 2025
सकाळ

# 'कणबरकर' यांच्या ग्रंथाबाबत आवाहन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्याबाबतच्या आठवणी 'प्राचार्य कणबरकर आठवणी आणि अनुभव' ग्रंथ रूपाने प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. त्यासाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन त्यांच्या कन्या डॉ. नमिता खोत यांनी केले आहे. प्राचार्य कणबरकर यांच्या बरोबर काम केलेल्या त्यांच्या संपर्कातील सहकारी, तसेच त्यांनी ज्या ज्या महाविद्यालयात व विद्यापीठात काम केले, तेथील विद्यार्थी यांनी आठवणींच्या स्वरूपात लेख, साहित्य पाठवावे. या माध्यमातून संकलित होणाऱ्या लेखांचे संपादन व संकलन करण्यासाठी डॉ. भालबा विभूते, डी. यू. पवार, रमेश जाधव, बी. एम. हिर्डेकर, टी. एस. पाटील, दिनकर पाटील, डॉ. खोत यांची समिती गठित केली आहे. ३० सप्टेंबरपर्यंत (डॉ. नमिता बाबासाहेब खोत, वक्रतुंड, प्लॉट नं. २१, आर. के. नगर, सोसायटी नं. ४, मोरेवाडी, कोल्हापूर- ४१६०१३) या पत्त्यावर लेख, साहित्य पाठवावे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 AUG 2025
पुढारी

# प्राचार्य रा. कृ. कणबरकर आठवणी, अनुभव ग्रंथासाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य रा. कृ. कणबरकर आठवणी, अनुभव ग्रंथासाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. डॉ. कणबरकर यांच्या जीवनात त्यांचा अनेक विद्यार्थी, प्राध्यापक, समाजातील अनेक मान्यवरांशी संबंध येऊन गेला. आठवणींच्या रूपाने त्यांच्याकडे तो ठेवा आहे. यातून त्यांना काही अनुभव आले असतील. सर्व ज्ञान अनुभवजन्य असते. या दृष्टीने त्यांच्या आठवणींचे 'प्राचार्य कणबरकर आठवणी आणि अनुभव' हा ग्रंथ रूपाने प्रसिद्ध करावयाचे ठरविले आहे. त्याचा लाभ पुढच्या पिढीला सुद्धा होईल. त्याकरिता त्यांच्याबरोबर काम केलेल्या त्यांच्या संपर्कातील सहकारी, तसेच त्यांनी ज्या-ज्या महाविद्यालयांत व विद्यापीठात काम केले, तेथील विद्यार्थी यांचेकडून आठवणींच्या स्वरूपात लेख, साहित्य मागविण्यात येत आहेत. डॉ. भालबा विभूते, डॉ. डी. यू. पवार, डॉ. रमेश जाधव, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. टी. एस. पाटील, डॉ. दिनकर पाटील आणि डॉ. नमिता खोत यांची समिती गठित केली आहे.